# साखर उद्योगावरील वेबिनारला प्रतिसाद

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाच्या वतीने साखर उद्योगासमोरील समस्या व उपाय या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या वेबिनारला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांच्या हस्ते या वेबिनारचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी वेबिनारमधील पहिल्या सत्रात डी. एम. गुरव यांनी साखर उद्योगासमोरील आर्थिक समस्या या विषयावर आपले विवेचन केले. ग्राहकांची क्रयशक्तीची कमतरता, ऊसदर, कर्मचाऱ्यांचे पगार, उत्पादकता खर्च, देखभाल खर्च, साखर उतारा, उत्पादकता व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा अभाव, यंत्रसामग्रीचा कार्यक्षमतेने वापर न होण्याची समस्या या विषयावर त्यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात विजय अवताडे यांनी करोना संसर्गाचा साखर उद्योगावर काय परिणाम होणार, याविषयी मत मांडले. करोनामुळे वार्षिक आर्थिक गणित कोलमडले आहे. त्यामुळे साखर विक्री कमी झाली आहे, याचा भविष्यात काय परिणाम होईल, याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात डॉक्टर बी. एम. हिलगे यांनी अर्थशास्त्रीय नुकसान याविषयी मत व्यक्त केले. सामाजिक आर्थिक व कायदेविषयक परिणामांबाबत विवेचन करत अर्थकारण आणि साखर उद्योग यांची सांगड घातली. १९३० साली आलेल्या जागतिक मंदीप्रमाणेच येत्या वर्षभरात मंदीचे सावट अधिक गडद होणार आहे व याचा परिणाम साखर उद्योगावर होणार असल्याने उद्योजकांनी आर्थिक नियोजन करावे, असे आवाहन यावेळी यानिमित्ताने करण्यात आले.

# शहरातील विलगीकरण केंद्रांत हजारावर नागरिक

कोल्हापूर टाइम्स टीम

राज्यातील तसेच परराज्यातील विविध जिल्ह्यातून शहरात तसेच जिल्ह्यात येणाऱ्या नागरिकांचा ओघ कायम आहे. महापालिकेने शहरात सुरू केलेल्या वेगवेगळ्या २० केंद्रामधील नागरिकांची संख्या १११४ वर पोहचली आहे. नागरिकांची संख्या वाढत जाईल तशी महापालिकेने कॉलेज, हॉटेल, बोर्डिंग ताब्यात घेण्यास सुरुवात केली आहे. सध्या हॉस्टेल व कॉलेजमध्ये सुरू करण्यात आलेल्या केंद्रांची संख्या १५ झाली आहे.

राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच अन्य राज्यातूनही नागरिक शहरात येत असून त्यांची सीपीआरमध्ये तपासणी केल्यानंतर अहवाल येईपर्यंत त्यांना संस्थात्मक विलगीकरण केले जात आहे. ज्यांचे अहवाल पॉझिटिव्ह आले, त्यांना सीपीआरमध्ये दाखल करण्यात येऊन उर्वरितांना १४ दिवस केंद्रातच ठेवण्यात येत आहे. दोन दिवसांत १६० नागरिकांचे संस्थात्मक विलगीकरण केले आहे.

बुधवारी शेंडापार्क येथील आरोग्य प्रशिक्षण केंद्रात ६५, खासगी ठिकाणी २९, आणि अंडी उबवणी केंद्रात २१, पंजाबराव देशमुख वसतिगृह १०१, गर्व्हन्मेंट पॉलिटेक्निक २, राजाराम कॉलेज ४९, अल्पसंख्यांक मुलींचे वसतीगृह ६९, आयसोलेशन ७, कृषी विद्यापीठ १००, शिवाजी विद्यापीठ २५२, शिवाजी विद्यापीठ मुलांचे वसतिगृह ६८, न्यू कॉलेज वसतीगृह ११९, सैनिकी मुलींचे वसतीगृह ९, विवेकानंद कॉलेज ३५, कमला कॉलेज ५५, डि. बी. पाटील वसतिगृह ९, माई तेंडुलकर वसतीगृह ११, जैन बोर्डिंग ३४, लिंगायत वसतिगृह ३७, हॉटेल मॅजेस्टिकमध्ये ४२ नागरिक आहेत.

# अंतिम सत्र परीक्षांसाठी 'युजीसी' निर्णयाची प्रतीक्षा

## शिवाजी विद्यापीठ : नियोजन, वेळापत्रक निश्चितीसाठी १८ सदस्यीय समिती नियुक्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विविध विषयांच्या अंतिम सत्राच्या परीक्षेच्या नियोजनासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) निर्णयाची शिवाजी विद्यापीठाला प्रतीक्षा लागली आहे.

राज्य शासनाच्या आदेशानुसार अंतिम सत्रातील परीक्षांचे नियोजन आणि वेळापत्रक निश्चितीसाठी विद्यापीठाने १८ सदस्यीय समिती नियुक्त केली. या समितीच्या आतापर्यंत तीन बैठका झाल्या आहेत. त्यातील शेवटच्या बैठकीत या समितीने विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राच्या अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांच्या संख्या, त्यांच्या परीक्षा घेण्याबाबतचा अहवाल मागविला आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने अंतिम सत्रातील परीक्षाही रद्दची मागणी 'युजीसी'कडे केली आहे.

दूरशिक्षण केंद्राचा अहवाल मिळाल्यानंतर त्यावर पुन्हा एकदा बैठक घेऊन अंतिम अहवाल विद्यापीठाला सादर करण्याचे नियोजन समितीने केले आहे. २७ मे रोजी होणाऱ्या विद्या परिषदेच्या बैठकीत विद्यापीठ प्रशासनाकडून या समितीचा अहवाल सादर होऊन त्यावर पुढील कार्यवाही होईल.

### दूरशिक्षण केंद्राचे ४१३३ परीक्षार्थी

दूरशिक्षण केंद्राचे पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे एकूण १७,१३३ विद्यार्थी असून, त्यातील प्रथम वर्षाच्या ७०००, तर द्वितीय वर्षाच्या ६००० विद्यार्थ्यांची परीक्षा होणार नाही. अंतिम सत्रातील परीक्षार्थी ४१३३ असून, त्यात पदविकेचे १५, पदवीचे १७३८, तर पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे २३५५ परीक्षार्थी आहेत. महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटकातून विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.